# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने वेटलिफ्टिंगपटूंना आर्थिक साहाय्य

राजगुरूनगर (दै. संध्या) : पतियाळा पंजाब येथे सुरु असलेल्या वेटलिफ्टिंगच्या राष्ट्रीय शिबिराकरीता निवड झालेले हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील वैष्णव ठाकूर आणि सारिका शिनगारे या विद्यार्थ्यांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने प्रत्येकी २५ हजारांचे आर्थिक साहाय्य करण्यात आले. याप्रसंगी संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे उपस्थित होते. शहाजी ठाकूर, मंगेश शिनगारे या पालकांनी धनादेशाचा स्वीकार केला. संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर यांची पतियाळा येथे होणाऱ्या राष्ट्रीय शिबिराकरीता निवड झाल्याबद्दल आनंद व्यक्त करून कॉमनवेल्थ स्पर्धे करिता भारतीय वेटलिफ्टिंग संघात निवड होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ कायम गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठिशी आहे. या विद्यार्थ्यांची कामगिरी अभिमानास्पद असून पालकांनी या खेळाडूंना मानसिक पाठबळ तर समाजाने आर्थिक पाठबळ देण्याची गरज व्यक्त केली. संस्था म्हणून आम्ही या विद्यार्थ्यांच्या पाठिशी असल्याचे ते म्हणाले. शहाजी ठाकूर, मंगेश शिनगारे या पालकांनी संस्थेने केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी तर आभार प्रा. तानाजी पिंगळे यांनी मानले.